जाहिरात मसुदा – महापालिका संकेतस्थळ
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**विषय - दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या ( हंगामी ) स्वरूपात**
**६ महिने कालावधीकरिता पद भरणेबाबत...**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागात दरमहा एकत्रित मानधनावर खाली नमूद केलेल्या पदांसाठी (हंगामी) तात्पुरत्या स्वरुपात ६ महिने कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरुपात भरणेबाबत, प्रस्तुत जाहिरातीतील नमुद केलेल्या पदांची शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पुर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून पोस्टाने अथवा समक्ष उपस्थित राहून थेट पध्दतीने मुलाखत घेणेकामी अर्ज मागविणेत येत आहे.

अर्जामध्ये चुकीची अथवा खोटी माहिती सादर करणाऱ्या उमेदवारांना निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविणेत येईल. पदनाम, पदसंख्या, एकत्रित मानधन व आरक्षण खालीलप्रमाणे :

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | दरमहा एकत्रित मानधन | सामाजिक आरक्षण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनु जाती | अनु जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आदुघ | खुला |
| १ | पशुशल्यचिकित्सक | १ | 65000/- | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| २ | पशुवैद्यकीय अधिकारी | ४ | 60000/- | - | - | १ | - | - | - | - | - | १ | २ |
| ३ | लाईव्ह स्टॉक सुपरवायझर | ४ | 24010/- | - | - | १ | - | - | - | - | - | १ | २ |
| ४ | ॲनिमल किपर | २ | 24010/- | - | - | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ५ | डॉग पिग स्कॉड कुली | १० | 21616/- | १ | १ | १ | - | - | - | - | २ | १ | ४ |
| एकूण | | २१ | | | | | | | | | | | |

वरील प्रवर्गनिहाय पदसंख्या व आरक्षण यामध्ये बदल होण्याची शक्यता असून त्याबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना राहतील.

**वयोमर्यादा : -**

१. उपरोक्त पदांसाठी सर्व प्रवर्गातील उमेदवारांचे वय जाहिरातींच्या दिनांकास किमान १८ वर्षे पुर्ण असणे आवश्यक राहील. तसेच खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४३ वर्षे इतकी राहील.

२. शैक्षणिक अर्हता :-

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
| --- | --- | --- |
| १ | पशुशल्यचिकीत्सक (सर्जन) | १) पशुवैद्यक शास्त्रामधील पदवी (BVSc & AH) उत्तीर्ण आवश्यक .<br>२) पशुवैद्यक शास्त्रामधील पशुशल्य विशारद या विषयामध्ये पदव्युत्तर (MVSC in Veterinary Surgery) आवश्यक.<br>३) संबधीत विषयातील कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| २ | पशुवैद्यकीय अधिकारी | १) पशुवैद्यक शास्त्रामधील पदवी (BVSc & AH) उत्तीर्ण आवश्यक.<br>२) श्वान संतती नियमन कार्यक्रम अंतर्गत २ वर्ष कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>३) संबधीत विषयातील १ वर्ष कामकाजाचा अनुभव आवश्यक. |
| ३ | लाईव्हस्टॉक सुपरवायझर | १) शासनमान्य संस्थेकडील पशुवैद्यक शास्त्रातील किमान पदवीका उत्तीर्ण आवश्यक किंवा<br>२) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील लाईव्ह स्टॉक सुपरवायझर कोर्स उत्तीर्ण असावा आणि लाईव्ह स्टॉक सुपरवायझर पदाचा किमान १ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| ४ | ऍनिमल किपर | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील पशुवैद्यकीय पदवीका उत्तीर्ण.<br>२) प्राणीसंग्रहालयाचे ठिकाणी कामाचा अनुभव आवश्यक. |
| ५ | डॉग पिग स्कॉड कुली | १) इयत्ता ४ थी परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) शारिरिक कष्टाची कामे करण्यास सक्षम असणे आवश्यक.<br>३) भारतीय जीव जंतू कल्याण मंडळ यांचेकडील मान्यताप्राप्त प्राणी कल्याण संस्था यामध्ये किमान १ वर्षे कामकाज केलेचा अनुभव. |

**अटी आणि शर्ती**

१) मानधनावरील नेमणुका पूर्णपणे तात्पुरत्या हंगामी स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायम पदी नेमणुकीचा हक्क राहणार नाही.

२) ज्या दिवशी म. न. पा. स सदर पदाची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशीशिवाय मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

३) मुलाखतीस येण्याकरिता उमेदवारास कोणत्याही प्रकारच्या प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

४) उपरोक्त पदासाठी विहित केल्यानुसार तसेच शैक्षणिक अर्हता व कामाच्या अनुभवानुसार मानधन अदा करण्यात येईल.

५) सर्व उमेदवारांनी मुलाखतीसाठी उपस्थित राहताना शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपात्र व अनुभवांबाबतच्या आवश्यक त्या प्रती व साक्षांकित केलेल्या प्रती उदा. गुणपत्रिका (मार्कशीट), सर्टिफिकेट, फोटो इ. सादर करणे बंधनकारक आहे.

६) निवड केलेल्या उमेदवारांना मनपाने ठरवून दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील. त्याप्रमाणे काम करणेस नकार दिलेस नेमणूक रद्द करणेत येईल.

७) सदर पदांची महाराष्ट्र आरक्षण कायदा २००४ नुसार मागासवर्गीयांचे आरक्षण लागू राहील.

८) उमेदवारांनी कार्यालयीन व प्राणिसंग्रहालयाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणतीही सवलत अनुज्ञेय नाही.

९) उमेदवारांची नेमणूक झाल्यानंतर बायोमेट्रिक पद्धतीने हजेरी नोंदविणे बंधन कारक राहील व हजेरी मस्टर वर रोजचे रोज स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय पगार अदा केला जाणार नाही.

१०) निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. सदर नेमणूक प्रक्रिया रद्द / फेरप्रक्रिया करणेचे अधिकार मा. आयुक्त सो. यांनी राखून ठेवले आहेत.

११) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही आजार उदभवल्यास त्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१२) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी आदेश निर्गमित झालेपासून आठ दिवसांच्या आत रुजू होणे बंधनकारक राहील. अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

**तरी इच्छुक उमेदवारांनी Walk in Interview करिता गुरुवार दिनांक ०१/०९/२०२२ रोजी दुपारी १०:०० वाजता मा.आयुक्त कक्ष ४ था मजला, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ येथे उपस्थित रहावे.यासाठी समक्ष पत्रव्यवहार केला जाणार नाही. तसेच आलेल्या उमेदवारांचे रजिस्ट्रेशन मुलाखतीच्या दिवशी सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत केले जाईल. वेळेनंतर आलेल्या उमेदवांराचा विचार केला जाणार नाही.**

**टीप -** उपरोक्त पदांकरिता उमेदवारांनी त्यांचे अर्ज व शैक्षणिक कागदपत्रे दिनांक२६/०८/२०२२ सायंकाळी ४.००वाजेपर्यंत पशुवैद्यकीय विभागात पोस्टाने अथवा समक्ष देणेत यावे.

सही/-

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८

# उमेदवाराने करावयाचा मराठी माध्यम अर्जाचा नमुना

प्रति

मा.आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी,पुणे-१८

विषय :- दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या (हंगामी) स्वरुपात पद भरणेबाबत.

संदर्भ :- जाहिरात क्र. दिनांक / /२०२२ प्रसिध्द झालेली जाहिरात

महोदय,

संदर्भिय जाहिरातीनुसार मी श्री./श्रीम. ______________________ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागात दरमहा एकत्रित मानधनावर ______________________ या पदासाठी हंगामी स्वरुपात ६ महिने कालावधीकरिता मुलाखत पध्दतीने नेमणूकीकरिता आवश्यक ती अर्हता धारण करीत असून, या पदासाठी निवड होण्याकरिता विहित नमून्यात अर्ज सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | संपुर्ण नाव | |
| २ | पत्रव्यवहाराचा पत्ता | |
| ३ | मोबाईल क्रमांक | |
| ४ | ईमेल आयडी | |
| ५ | जन्मतारीख | |
| ६ | लिंग | |
| ७ | जात | |
| ८ | प्रवर्ग | |
| ९ | पदनाम | |

**१०.अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशिल-**

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | संस्था/ विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | प्राप्त गुण | एकुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**११. अनुभव**

| अ.क्र. | तपशील | वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

वर नमूद केलेला तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करते/करतो, की वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे एकत्रित मानधन नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र राहीन तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ - आपला विश्वासू

अर्जदाराची सही ________________________

दिनांक / /२०२२ अर्जदाराचे नाव__________________________

सहपत्रे- अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडत आहे.
(ज्या क्रमाने जोडलेल्या आहेत त्याप्रमाणे लिहणे)

१) -------------------------------------------

२) -------------------------------------------

३) -------------------------------------------

४) -------------------------------------------

५) -------------------------------------------

**टिप-आवश्यक कागदपत्राव्यतिरिक्त अनावश्यक कागदपत्रे जोडू नये.**